Jr.No.41012 UGC Approved Refereed Journal

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Peer Reviewed International Refereed Research Journal

# VIDYAWARTA®

SPECIAL ISSUE January 2019

# स्थानिक इतिहास लेखन

■ अतिथि संपादक ■

डॉ. इंद्रजित भाऊराव जाधव
प्राचार्य
बी.डी. काळे महाविद्यालय घोडेगाव (पुणे)

डॉ. नाथा रामभाऊ मोकाटे
इतिहास विभाग प्रमुख
बी.डी. काळे महाविद्यालय घोडेगाव (पुणे)

Certified True Copy
21/11/19
PRINCIPAL
CSM's Arts & Commerce College
Chakan, Tal-Khed, Dist-Pune

Special Issue January 2019

# Vidyawarta™

International Multilingual Research Journal

आबेगाांव तालुका विद्या विकास मंडळ संचलित

## बी.डी.काळे महाविद्यालय घोडेगाव,

ता.आंबेगाव, जि.पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार योजनेंतर्गत

## 'स्थानिक इतिहास लेखन'

या विषयावर राज्यस्तरीय कार्यशाळा

❑ अतिथी संपादक ❑

डॉ. इंद्रजित भाऊराव जाधव

प्राचार्य

बी.डी.काळे महाविद्यालय, घोडेगाव, ता.आंबेगाव जि.पुणे

डॉ. नाथा रामभाऊ मोकाटे

इतिहास विभाग प्रमुख

बी.डी.काळे. महाविद्यालय घोडेगाव,ता.आंबेगाव, जि.पुणे

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

विद्यावार्ता : Interdisciplinary Multilingual Refereed Journal Impact Factor 5.131 (IIJIF)

Certified True Copy

PRINCIPAL

CSM's Arts & Commerce College

Chakan Tal-Khed Dist-Pune

36) १९४२ ते १९६० या काळातील ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक कॉम्रेड ... || 120
प्रा. विधाटे गणेश शंकर

37) कोपरगांवातील पेशव्यांचे वाडे || 124
प्रा. झरेकर रमेश सोनू

38) प्राचीन बागलाणची ऐतिहासिक पार्श्वभूमी || 126
प्रा.संदिप भामरे

39) प्राचीन महाराष्ट्राच्या इतिहासात तेर चे महत्व || 128
डॉ शेख अब्दुलसमद बादशहा

40) कल्याणातील ऐतिहासिक वास्तुस्थापत्य कला || 130
लोखंडे चारुशिला उत्तम शशिकला

41) ऐतिहासिक पर्यटन भोर || 137
प्राचार्य डॉ. आर. व्ही ढेरे

42) देगलूर तालुक्यातील नरंगल येथील कलात्मक मुर्तिशिल्पे || 141
डॉ. मारोती पोमा चव्हाण

43) संग्रामदुर्ग किल्ल्याचा इतिहास || 146
प्रा. विकास मुकुंद देशमुख

44) स्थानिक इतिहासलेखनाची आवश्यकता || 148
डॉ. लहू कचरु गायकवाड

45) प्लेगमुळे वसईत वसलेले गोखिवरे गांव || 153
Dr. Afegine Augustine Tuscano

46) सिन्नर आणि पेशवेकालीन दुष्काळ ... || 158
अंजली वसंतकुमार सोईतकर

47) नागपुर शहरातील भोसल्यांचे महत्वपूर्ण राजवाडे, त्यांचा इतिहास व स्थापत्यकला... || 162
श्री. संदिप मारोती महाजन

https://sites.google.com/site/vidyawartajournal http://www.vidyawarta.blogspot.com



C.S.M's Arts & Com. College CHAKAN 410501 Tal-Khed Dist-Pune.
Principal
C.S.M's Arts & Commerce College
Chakan Tal-Khed Dist-Pune.

43

# संग्रामदुर्ग किल्ल्याचा इतिहास

प्रा. विकास मुकुंद देशमुख
कला व वाणिज्य महाविद्यालय,
चाकण, ता.खेड., जि.पुणे

***********

पुणे जिल्हातील खेड तालुक्यातील चाकण हे महत्वाचे शहर म्हणून ओळखले जाते. चाकण शहर पुणे–नाशिक राष्ट्रीय महामार्गावर, पुण्यापासून १८ मैल अंतरावर आहे.या ठिकाणी संग्रामदुर्ग हा महत्वाचा ऐतिहासिक भुईकोट किल्ला आहे. या किल्ल्याला मराठांच्या इतिहासामध्ये महत्वाचे स्थान आहे.

**संग्रामदुर्गचा इतिहास :**

हा किल्ला सामान्यपणे चौकोनी आकाराचा होता. यास चोहोबाजूंनी पुष्कळ बुरुज होते. तट भरपूर उंच आणि रुंद बांधणीचा होता.किल्ल्याभोवती ३० फुट खोल आणि ५५ फुट लांब खंदक होता.तो सतत पाण्याने भरलेला असे.किल्ल्याचा मुख्य दरवाजा पूर्वेकडे होता. तो ओलांडल्यावर आत शिरण्यासाठी आणखी काही दरवाजे ओलांडावे लागत.शिवकालीन पत्रसारसंग्रह आणि ग्रांट डफच्या पत्रामधील नोंदी नुसार हा किल्ला बहामनी राजवटीत बांधला.या किल्ल्यात रणमंडळ आहे. रणमंडळ म्हणजे दरवाज्यासमोर आतल्या बाजूस भिंत असते. या भिंतीमुळे अनोखा माणूस भिंत किंवा तट यामधील जागेवरून डाव्या किंवा उजव्या बाजूस पुढे सरकतो. पण ती वाट बऱ्याच अंतरावर बंद केली असल्यामुळे अनोख्या माणसाला किल्ल्यात शिरता येत नाही.

बहामनी काळापासून चाकण गावास महत्त्व असून अल्लाउद्दिन अह्मद्शहाच्या राजवटीत (इ.स. १४३८ ते १४५८) मलिक–उल–गुजार यानेसुमारे ७–८ वर्षे चाकणला मुख्य ठाण्याचा दर्जा दिला होता. या किल्ल्यासंदर्भात इ.स.१४४३ पासून उल्लेख आढळतात. त्यावेळेस हा किल्ला बहामनी राजवटीच्या स्वाधीन होता. इ.स.१५९५ मध्ये अहमदनगरच्या बहादुरशहा याने हा किल्ला शिवाजीराजांचे आजोबा मालोजी भोसले यास दिला. इ.स.१६४७ मध्ये शिवाजीराजांनी चाकणचा किल्लेदार फिरंगोजी यास वश करून हा किल्ला घेतला.

चाकणचा संग्रामदुर्ग किल्ला कोणी बांधला यासंबधी ग्रांट डफ लिहितो, अल्लाउद्दिन खिलजी दक्षिणेत येण्यापूर्वी सुमारे १०० वर्षे अगोदर बुशदीद हबशी नावाच्या माणसाने हा किल्ला बांधला आहे. इ.स. १२६५ मध्ये संग्रामदुर्ग भोवताली ३० फूट खोलीचा खंदक खोदण्यात आला, व त्यामध्ये पाणी सोडण्यात आले. पुढे १५ व्या शतकात डागडुजी करण्यात आली. दुसरा बहामनीराजा याच्याकाळात (१४३४–१४५७) संग्रामदुर्गला मोठी तटबंदी बांधण्यात आली.

**किल्ल्याचे ऐतिहासिक महत्व — लढाई —**

शिवाजीमहाराजा विरुद्ध शाहिस्तेखानाची मोहीम (इ.स.१६६०) — चाकण लष्करीदृष्ट्या फार महत्वाचे होते. भीमा व घोडनदी या दोन नद्यापलीकडे लागून मुघल सरहद्द होती.डोंगर दऱ्या फारशा नसल्यामुळे ते ठिकाण मराठ्यांच्या तब्यातून जिंकून घ्यावे म्हणजे अहमदनगरशी मुघलांचे दळणवळण सहज राहील असे शाहिस्तेखानास वाटले. तसे उत्तरेकडून मराठ्यांचा हल्ला होण्याची भीतीही त्यामुळे नाहीशी झाली असती. बोरघाट खिंडीपासून चाकण ३१ मैलांवर असून अहमदनगरहून कोकणात उतरण्याचा तो अत्यंत जवळचा मार्ग होता.

शाहिस्तेखानाने पावसाळा पुण्यातच घालविण्याचे ठरविले होते.परंतु तो पुण्यास येण्यापूर्वी मराठ्यांनी चाकण–पुणे भागातील पिक, धान्ये, गवत, कडबा वैगेरे नाहीसा केला होता.त्यामुळे मुघली सैनिकांना व जनावरांना खाण्यापिण्याच्या सामानाचा अत्यंत तुटवडा पडला.तेंव्हा पुण्याहून चाकणकडे जाण्याचे शाहिस्तेखानाने निश्चित केले.त्याप्रमाणे पुण्यातील तळ हालवून तो दोनच दिवसात चाकणास सर्व सैन्यासह पोहोचला.२१ जून १६६० ला शाहिस्तेखानाने चाकणच्या किल्ल्यास वेढा दिला.त्याने आपले सैन्य चार पथकात विभागले. किल्ल्यानजिक जाजोजाग उंचवटे करून अवघड तोफा किल्ल्यावर मारा करण्यासाठी आणून ठेवल्या. पावसाळ्यामुळे वेढ्याच्या कामात फारशी प्रगती होऊ शकली नाही. त्यानंतर मराठ्यांनी किल्ल्यातून बाणांचा



Certified True Copy
PRINCIPAL 7/11/19
CSM's Arts & Commerce College
Chakan, Tal-Khed, Dist-Pune